## राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 19(3) अन्वये अपील क्रमांक 1178/2007, अपील क्रमांक 1179/2007, अपील क्रमांक 1341/2007 व अपील क्रमांक 1342/2007.

श्री.रविंद्र परशरामजी जैन,
मु. विवेकानंद वार्ड, स्टेट बॅक कॉलनीचे मार्ग,
गणेशनगर, पो. ता. उमरखेड,
जिल्हा यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**विरूध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिशद बांधकाम विभाग क्रमांक 2,
यवतमाळ,

श्री. पी. डब्ल्यू. खराबे,
जनमाहिती अधिकारी तथा,
प्रभारी उपविभागीय अधिकारी,
जिल्हा परिशद बांधकाम उपविभाग,
उमरखेड, जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.10.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 19(3) अन्वये 4 द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या चारही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक 10.3.2008 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्रमांक 1178/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक 11.7.2006 रोजी उपविभागीय स्तरावर झालेल्या बी–1 करारनामा कामाची यादी मिळणेबाबत. यादीमध्ये ठेकेदाराचे नांव, कामाची किंमत, कामाचा कालावधी, करारनामा क्रमांक, दिनांक, काम

केलेले ठिकाण, काम संपलेले दिनांक इत्यादी उल्लेख करावा. माहितीचा कालावधी 1 जानेवारी 2006 ते 11 जुलै पर्यंत. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक 22.7.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक 14. 2.2007 रोजी माहिती उपलब्ध करून द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करून दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपील क्रमांक 1179/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक 17.7.2007 रोजी उपविभागांतर्गत एकूण किती गिट्टीखदानी आहेत त्यांची नांवे व त्या त्या खदानीवर आज तारखेपर्यंत 80 एम.एम. गिट्टा, 60 एम.एम. गिट्टी, 40 एम.एम.गिट्टी किती शिल्लक आहे व ती कोणत्या रोडकरिता फोडण्यात आली त्या रस्त्याचे नांव. शकाधाळा व महा.ग्रामीण रो.ह.यो. या योजनेतील त्या त्या खदानीवरील कोणकोणता माल शिल्लक आहे त्या मालाचे विवरणासह संपूर्ण माहिती मिळणेबाबत. पांदन रस्ते मंजूर असल्यापासून ते आजपर्यंत वर दर्शवलेल्या खदानीचे नाव, मालाचे वर्णन, हजेरी पत्रका नुसार खदानवर फोडलेला माल व आज रोजी शिल्लक असलेला माल याची संपूर्ण माहिती मिळणेबाबत. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक 22.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक 14.2.2007 रोजी माहिती उपलब्ध करून देण्याचा निर्णय करून आदेश देण्यात आलेले दिसते. परंतु माहिती उपलब्ध करून दिलेली दिसत नाही व म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

4. अपील क्रमांक 1341/2007 मध्ये दिनांक 11.7.2006 रोजी म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत खालील पांदन रस्त्यावरील 1) उमरखेड ग्रामीण, 2) फूलसांगी–शिवूर, 3) काळी (दौ.) पिंपळगांव, 4) शिरपूली–डोंगरगांव, 5) वडद–दगडथर, 6) उटी–हिंगणी या रस्त्याला प्रशासकीय मान्यता मिळाल्यापासून आजपर्यंत कूशल–अकूशल खर्च व दि. इ. उल्लेख आपल्या विभागामार्फत चालू असलेल्या कामांना मंजूरी मिळाली तेंव्हा पासून आजपर्यंत त्यावर झालेला खर्च, प्रशासकीय मान्यता रक्कम, दिनांक वेगवेगळा झालेला खर्चासहीत माहिती देणेबाबत. माहितीचा कालावधी 1 जानेवारी 2005 ते 11 जुलै 2006 पर्यंत. प्रत्येक पांदन रस्त्यावर झालेला कुशल–अकुशल खर्च प्रशासकीय मान्यता रक्कम, दिनांक व वर विचारलेल्यानुसार माहिती देण्याबाबत. व्यक्तीशः माहिती घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक 22.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणीस उपस्थित राहण्याबद्यल पत्र दिलेले दिसून येते. परंतु निर्णय झालेला नाही व त्यामुळे द्वितीय अपील दाखल केले आहे.

5. अपील क्रमांक 1342/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक 11.7.2006 रोजी आपल्या उपविभागांतर्गत चालू असलेल्या पांदन रस्त्यासाठी लागत असलेल्या आपल्या शासकीय खदान वरील आर.एम.आर. (R.M.R.) रजिष्टरची झेरॉक्स सत्यप्रत मिळणेबाबत. वर दर्शविलेल्या आपल्या शासकीय खदान वरील साहित्याचे आर.एम.आर. रजिस्टरची झेरॉक्स सत्यप्रत. माहितीचा कालावधी 1 जानेवारी 2005 ते 11 जुलै 2006 पर्यंत. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक 22.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये सुनावणीच्या करिता तारीख दिलेली होती. परंतु अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

6. वरील प्रमाणे 4 ही द्वितीय अपीलाचे संदर्भातील राज्य जनमाहिती अधिकारी हे तत्कालीन उपविभागीय अधिकारी दिसून येतात. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली 4 ही अर्जाचे संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करून दिलेली दिसून येत नाही. अपील क्रमांक 1178/2007 व अपील क्रमांक 1179/2007 मध्ये जरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून द्यावी असे आदेश दिलेले होते तरीसुध्दा माहिती उपलब्ध करून दिलेली नाही व त्यामुळे तत्कालीन संबंधित जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिशद बांधकाम उपविभाग क्रमांक 2, उमरखेड हे दोशी आढळून येतात व माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 20(1) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. परंतु संबंधित जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी हे दिनांक 30.4.2007 रोजी सेवानिवृत्त झाले आहेत व त्यामुळे आज सदरच्या अपीलाचे सुनावणीस विद्यमान जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हेच हजर आहेत व त्यामुळे अधिनियमाचे कलम 20(1) च्या परंतुकाप्रमाणे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना शास्ती लादण्याच्या संदर्भामध्ये त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी त्यांना देता येत नाही. मात्र सदरच्या अपीलाचे निर्णयानंतर सदरची शास्ती लादण्याच्या संदर्भामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिशद, यवतमाळ यांनी संबंधित राज्य जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे किंवा खुलासा आयोगाचे पुढे दिनांक 27.3.2008 रोजी पर्यंत सादर करणे संयुक्तिक राहील व तसे सादर न केल्यास शास्ती कायम करण्यात येईल यांची नोंद घेण्यात यावी. अपील क्रमांक 1341/2007 व अपील क्रमांक 1342/2007 मध्ये प्रथम अपीलात सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले दिसून येते व त्यांना त्याबाबत ताकीद देणे संयुक्तिक राहील.

## आ दे श

1) अपील क्रमांक 1178 / 2007, अपील क्रमांक 1179 / 2007, अपील क्रमांक 1341 / 2007 व अपील क्रमांक 1342 / 2007 यामधील अनुक्रमे दिनांक 11.7.2006, दिनांक 17.7.2006, दिनांक 11.7.2006 व दिनांक 11.7.2006 च्या अर्जाचे अनुशंगाने अधिनियमाचे कलम 7(1) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करून दिलेली नसल्यामुळे प्रत्येक अपीलात रूपये 25,000 /- ही शास्ती संबंधित जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिशद, बांधकाम उपविभाग क्रमांक 2, उमरखेड यांचे विरूध्द कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा राज्य माहिती आयोगाकडे दिनांक 27.3.2008 पर्यंत सादर करण्यात यावा. अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल. सदरची जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिशद, यवतमाळ यांची राहील व त्याप्रमाणे त्यांनी आयोगाकडे अहवाल सादर करावा.

2) अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अर्जामधील माहिती हा निर्णय मिळाल्या पासून 30 दिवसाचे आंत विनामुल्य छायांकित प्रतीच्या संदर्भात उपलब्ध करून देण्यात यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिशद, यवतमाळ यास स्वतंत्रपणे रजिस्टर पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर.

दिनांक 10.3.2008

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**